
REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 5 | FEBRUARY - 2019

# ॲड. हरिदास बाबू आवळे यांचे विदर्भातील दलित चळवळीतील योगदान

प्रा. पंकज वामन मून
सहायक प्राध्यापक, इतिहास विभाग, श्री. साईबाबा लोकप्रबोधन आर्ट्स कॉलेज,
वडनेर, ता. हिंगणघाट, जि. वर्धा.

## प्रस्तावना



डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बहुजन समाजाच्या उत्कर्षाकरिता जो सामाजिक लढा उभारला तो लढा आधुनिक भारताच्या इतिहासात 'न भूतो न भविष्यतो' अशाच स्वरुपाचा होता. या लढ्यामध्ये आपले जीवन सर्वस्वी पणाला लावून, बाबासाहेबांच्या खांद्याला खांदा लावून लढणारा व बाबासाहेबांच्या विचारांचा पाईक, सच्चा सेनानी म्हणजे हरिदास बाबू आवळे होय. हरिदास बाबू आवळे यांनी कोणत्याही पदाची अभिलाषा न बाळगता आयुष्यभर बाबासाहेबांच्या विचाराचा मध्यप्रांत व्हाडमध्ये प्रचार व प्रसार करुन आपल्या कर्तृत्वाने आंबेडकरी चळवळीला गतिमान करण्याचे महत्वपूर्ण कार्य केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जो मानवमुक्तीचा लढा उभारला. या लढ्याला ज्यांनी आपले संपूर्ण जीवन देऊन एका विशिष्ट ध्येयाप्रत पोहचविण्यासाठी, आपल्या कुटुंबाची, संसाराची पर्वा केली नाही व सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीला गती दिली. यात जशी पश्चिम महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांनी साथ दिली, तशीच साथ मध्य प्रांतातील कार्यकर्त्यांनी विशेषतः बाबू एल. एन. हरदास, ना. ह. कुंभारे, बॅ. राजाभाऊ खोब्रागडे, हरिदास बाबू आवळे यांनी दिली. कर्मवीर ॲड. हरिदास बाबू आवळे यांचे कार्यकर्तृत्व हे अशाच सामान्यातून आलेल्या असामान्य व्यक्तीचे आहे. संपूर्ण आयुष्य आंबेडकरी तत्वज्ञानाचा प्रसार व प्रचार करीत एक साधारण कार्यकर्ता म्हणून जीवनयापन केले आणि आंबेडकरी चळवळीला गतिमान करुन नवीन दिशा दाखविली. अशा कर्तृत्ववान व्यक्तीचे जीवन हे एखाद्या फिनिक्स पक्षाप्रमाणे असते. अशा व्यक्तीच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकण्याचा अल्पसा प्रयत्न या संशोधनाद्वारे करण्यात आला आहे.

## ॲड. हरिदास बाबू आवळे यांचा आंबेडकरी चळवळीत प्रवेश

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुरु केलेल्या मानवमुक्तीच्या लढ्याकडे हरिदास बाबू आवळे हे विद्यार्थी दशेत असतानांचा आकर्षित झाले होते. आपल्या अस्पृश्य बांधवांच्या विकासाचा विचार त्यांच्या मनात सतत येत होता व यासंदर्भात ते आपल्या सहकाऱ्यासोबत चर्चा करत असत. तसेच आंबेडकरी चळवळीला व्यापक बनविण्यासाठी योजना आखत. मध्यप्रांत व्हाडात आंबेडकरी चळवळ हरदास एल. एन. यांच्या नेतृत्वाखाली आकार घेत होती. ते मानवमुक्तीचे आंदोलन हरिदास बाबू आवळे यांना आकर्षित करीत होते. 12 जानेवारी 1939 ला एल. एन. हरदास यांचे निर्वाण झाले व 1940 ला हरिदास बाबू आवळे यांनी आंबेडकरी आंदोलनात प्रवेश केला.

हरिदास बाबू आवळे यांनी आपल्या कर्तृत्वाने आंबेडकरी चळवळीला गतिमान करण्याचे जे स्वप्न बघितले ते पूर्ण करण्यासाठी स्वतःला चळवळीमध्ये समर्पित केले. त्यांना सामाजिक कार्याची आवड असल्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुरु केलेल्या मानवमुक्तीच्या लढ्यात पदार्पण करुन आंबेडकरी चळवळीत काम केले.

## राजकीय कार्य

ॲड. हरिदास बाबू आवळे यांनी 1940 ला सार्वजनिक जीवनातील प्रवासास प्रत्यक्ष सुरुवात केली. बाबु एल. एन. हरदास यांच्या निधनामुळे आंबेडकरी चळवळीचे फार मोठे नुकसान झाले होते. आंबेडकरी चळवळीत एक पोकळी निर्माण झाली होती ही पोकळी ॲड. हरिदास बाबू आवळे यांनी भरुन काढली. हरिदास बाबू आवळे यांनी राजकीय क्षेत्रात पदार्पण केले त्या वेळेपर्यंत मध्यप्रांत डॉ. आंबेडकरांच्या मार्गदर्शनाखाली अनेक दलित नेत्यांनी संपूर्ण प्रदेश समाज जागृती करुन पिंजून काढला होता.

तत्कालीन विदर्भ व आसपासच्या भागात दलित समाजामध्ये मोठ्या प्रमाणात आंबेडकरी चळवळीचे बीजारोपण होऊन राजकीय व सामाजिक जागृती निर्माण झाली होती व याच वातावरणातील हरिदास बाबू आवळे हे उत्पत्ती असून त्यांना योग्य असा मंच प्राप्त झाला होता. सन 1942 ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांमधील सर्व पोटजातींना एकत्रित आणण्याच्या उद्देश्याने नागपूरला दलितांची एक परिषद बोलावली व स्वतंत्र मजूर पक्षाला विसर्जित करुन शेड्युल्ड कास्ट फेडरेशन या नव्या पक्षाच्या स्थापनेची घोषणा केली. यावेळी प्रत्यक्षपणे हरिदास बाबू आवळे राजकीय व सामाजिक क्षेत्राने उतरले होते. याच काळात म्हणजे 1941 पासून पुढे हरिदास बाबू आवळे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या समता सैनिक दल या सामाजिक संघटनेत प्रवेश करुन एका सच्चा सैनिकाची भूमिका पार पाडली. सन 1943 मध्ये त्यांना शेड्युल्ड कास्ट फेडरेशनचे सरचिटणीस बनविण्यात आले.

ॲड. बाबू आवळे यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीत अनेक महत्वपूर्ण कार्य केले त्यात प्रामुख्याने 1) सन 1942 ला नागपूर येथे झालेल्या अखिल भारतीय दलित वर्ग परिषदेतील कामगिरी. 2) अखिल भारतीय शेड्युल्ड कास्ट फेडरेशनच्या संदर्भातील कामगिरी. 3) 1946 च्या हंगामी सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रचारकार्यात बाबू आवळे यांची भूमिका. 4) मध्य प्रांत वऱ्हाड लेजिस्लेटिव्ह असेंब्लीच्या निवडणुकीतील उमेदवारी. 5) वर्धा येथील शेड्युल्ड कास्ट फेडरेशनच्या जंगी मिरवणुकीतील आवळे यांची कामगिरी. 6) 1947 ला नागपूर सत्याग्रहातील भूमिका. 7) समता सैनिक दलावर बंदी आणि आवळे यांची भूमिका इत्यादी महत्वपूर्ण मुद्दे व इतर अनेक घटनांचा समावेश होतो.

## सामाजिक कार्य

ॲड. बाबू हरिदास आवळे यांचा सामाजिक क्षेत्रातील वावर अतिशय महत्वपूर्ण असून त्यांनी राजकीय कार्याबरोबरच सामाजिक क्षेत्रामध्येही भरीव कामगिरी केली. शोषित, पीडीत कामगारांच्या कल्याणाकरिता ते अहोरात्र झटत होते. सामाजिक क्षेत्रात कार्य करताना ते कधीही बाह्या अमिषांना बळी पडले नाही. सामाजिक क्षेत्रात कार्य करताना मानवी हक्कासाठी त्यांचा लढा होता. मध्य प्रांत वऱ्हाडातील अस्पृश्य समाज सवर्णांच्या जाचाला कंटाळून तसेच रोजगाराच्या शोधात नागपूर शहरात स्थलांतरित झाला. याच सुमारास मध्य प्रांत वऱ्हाडची राजधानी नागपूर येथे टाटाने 1871 ला एम्प्रेस मिल व मॉडेल मिलची स्थापना केल्यामुळे बहुतांश अस्पृश्य कामगार मंडळी तेथे कामाला लागली. हरिदास बाबू आवळे यांनी आपल्या सामाजिक कार्याची सुरुवात सन 1940 ला समता सैनिक दलाचा सैनिक म्हणून केली होती. पुढे 1942 साली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या शेड्युल्ड कास्ट फेडरेशनचे ते मध्य प्रांत वऱ्हाडातील सरचिटणीस बनले होते. नागपूर शहरातील अस्पृश्य कामगारांची दैनावस्था व मिल कामगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी एखाद्या मजूर संघटनेची आवश्यकता आवळे बाबूंना वाटली आणि मध्य प्रांत वऱ्हाडची राजधानी नागपूर येथिल कस्तुरचंद पार्कमध्ये भरलेल्या पी. डब्ल्यू. डी. कामगारांच्या सभेत 'सिद्धार्थ कामगार संघाची' स्थापना 1955 साली करण्यात आली.

## धर्मांतर व धर्मप्रचाराचे कार्य

नाशिक येथील येवले मुक्काती धर्मांतराची घोषणा करण्याअगोदर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जगातील प्रमुख धर्मांचा अभ्यास केला आणि जो धर्म माणसाला माणुसकीचा दर्जा करुन देऊ शकतो तो म्हणजे बौद्ध धम्म होय. मी हिंदु म्हणून जन्माला आलो पण हिंदु म्हणून मरणार नाही अशी घोषणा केल्यानंतर संपूर्ण भारतभर खळबळ माजली व डॉ. आंबेडकर कोणता धर्म स्विकारणार याकडे सर्व भारतीयांचे लक्ष वेधले होते. ॲड. हरिदास बाबू आवळे यांनी धर्मांतरासंबंधी लोकमत अनुकूल करण्याचा प्रयत्न सतत चालविला होता. डॉ. आंबेडकर व बाबू आवळे यांच्यात नेहमी बौद्ध धम्मसंबधी चर्चा व्हायच्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आदेशानुसार हा बौद्ध धम्मदीक्षेचा कार्यक्रम नागपूर शहरात भारतीय बौद्धजन समिती, नागपूरतर्फे करण्याचे निश्चित झाले. त्यानुसार नागपूर शहरातील प्रत्येक वस्तीतुन दोन प्रतिनिधींची निवड करुन स्वागत समितीत अनेक पुढाऱ्यांचा समावेश होता.

हरिदास बाबू आवळे हे मध्यप्रांत वऱ्हाडातील डॉ. आंबेडकरांच्या चळवळीचे पाईक होते. त्यांनी या परिसरात आंबेडकरी तत्वज्ञान घरोघरी पोहचविले होते. कुशल संघटक असल्यामुळे हजारोंच्या संख्येने अस्पृश्य समाज हा आता बौद्ध धर्माचा स्विकार करणार असून धर्मांतराच्या घटनेमुळे अस्पृश्य समाजाच्या अतिहासातील ही एक अभूतपूर्व घटन असल्यामुळे धम्मदीक्षेला विशेष महत्व प्राप्त होईल म्हणूनच सर्व जनतेला आवाहन करण्यात आले होते. हरिदास बाबू आवळे हे मध्य प्रदेश शे. का. फे. आर्गनायझिंग ॲण्ड सुपरवायजिंग सेक्रेटरी असल्यामुळे त्यांच्यावर धर्मांतराचा सोहळा यशस्वी पार पाडापा आणि मध्य प्रांत वऱ्हाडातील अस्पृश्य जनतेला नागपूर येथिल धम्मदीक्षा सोहळ्याकरिता हजरोंच्या संख्येने उपस्थित राहावे म्हणून मध्य प्रदेश शे. का. फे. च्या वतीने सर्व अस्पृश्य जनतेस विनंती करण्यात आली. अशा आशयाचे पत्रक हरिदास बाबू आवळे यांनी दि. 5 ऑक्टोबर 1956 रोजी म्हणजेच धम्मदीक्षेच्या दहा दिवस अगोदर काढलेले होते. हरिदास बाबू आवळे यांच्या अथक परिश्रमामुळेच लाखोंच्या संख्येने अस्पृश्य समाज धम्मदीक्षेच्या सोहळ्याकरिता उपस्थित होता. धम्मदीक्षेच्या सोहळ्याच्या यशस्वी आयोजनामध्ये त्यांचा सिंहाचा वाटा होता हे विसरता येणार नाही.

## निष्कर्ष

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना जे खंबीर कार्यकर्ते चळवळीला बळ प्राप्त करुन देण्यासाठी मिळाले त्यात हरिदास बाबू आवळे हे एक होते. आवळे यांनी आपल्या कार्यकर्तृत्वाने चळवळीला नवी दिशा दिली. खरं तर बाबासाहेबांच्या व्यक्तिमत्वामुळे, त्यांच्या विचारामुळे आणि त्यांच्या कर्तृत्वाच्या तालमीतून आवळे बाबूंच्या जीवनाची जडणघडण झाली. आवळेनी आंबेडकरी चळवळीला समर्पित केले होते. त्याचा परिणाम असा झाला की, आंबेडकरी

चळवळ उत्तरोत्तर गतिमान होत गेली. याचे श्रेय आवळे यांना जाते. डॉ. आंबेडकरांनी जो दलित मुक्तीचा लढा उभारला त्यात ज्यांनी ज्यांनी या लढ्यात सहभागी होऊन स्वतःला झोकून दिले त्यात आवळे बाबूंची एक सच्चा आंबेडकरी पाईक म्हणून गणना करावी लागेल. डॉ. आंबेडकरांच्या सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीला गती देण्याचे काम ज्याप्रमाणे पश्चिम महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांनी केले. त्याचप्रमाणे मध्य प्रांतातील कार्यकर्त्यांनी केले. या कार्यकर्त्यांमध्ये बाबू आवळे यांचे सक्रिय योगदान होते.

अशा प्रकारे चळवळीच्या इतिहासात, दीक्षाभूमीच्या चळवळीत स्वतःचे नाव अजरामर केले यात दुमत नाही. आवळे बाबूंनी जर दीक्षा मैदानावर बुद्धाची मुर्ती बसविली सनती तर दीक्षा मैदान बौद्धांना मिळाले नसते याचे संपूर्ण श्रेय बाबू आवळेंना जाते. दीक्षाभूमीच्या जडणघडणीत बाबू आवळे यांचा सिंहाचा वाटा होता. त्याचप्रमाणे त्यांनी बौद्ध धम्मदीक्षेला वैधता मिळवून दिली होती. मेश्राम–शंभरकर खटल्यामुळे ॲड. आवळे यांनी नागपूरातील बौद्ध जनतेकडून एक एक रुपया गोळा करुन दिल्लीच्या सुप्रिम कोर्टात अपील केले. तेव्हाचे मुख्य न्यायधिश पी. बी. गजेंद्रगडकर व इतर न्यायाधिशांनी 26 ऑक्टोबर 1964 ला मुंबई हायकोर्टाचा निकाल नाकारुन हे मान्य केले आहे की, 14 ऑक्टोबर 1956 चा समारोह हा धम्मदीक्षा समारोहच होता ती राजकीय सभा नव्हती. असा ऐतिहासिक निर्वाळा दिला. बाबू आवळेनी या खटल्यामुळे जी मेहनत घेतली त्यांच्या सन्मानाप्रित्यर्थ 18 डिसेंबर 1964 रोजी अंबाझरी बौद्ध विहार येथे सभा घेऊन नागपूरातील बौद्ध जनतेनी त्यांना 'धम्मरक्षक' अशी पदवी बहाल करुन त्यांचा गौरव केला.

## संदर्भसूची


1) जामगडे विनायक, 'आंबेडकरी चळवळीत ॲड. हरिदास बाबू आवळे यांचे योगदान', डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन, रा. तु. म. नागपूर विद्यापीठ, प्र. आ. 2002.

2) सुखदेवे, डी. एल., 'कर्मवीर बाबू हरिदास आवळे यांचा जीवनसंघर्ष', प्र. आ. जुलै 1984, कर्मवीर आवळे प्रकाशन समिती, नागपूर.

3) मानकर, डी. एफ, 'बाबा तुम्हारे जाने के बाद', प्रकाशन विनायक मानकर वाचनालय, संबोधी विहार, दीक्षानगर, नागपूर, प्र. आ. 1971.

4) आंबेडकर य. भि. (संपा.), सा. जनता, अंक 11 वा, वर्ष 19 वे, 2 जुलै 1955, मुंबई.

5) मुन वसंत, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे बहिष्कृत भारत आणि मुकनायक', महाराष्ट्र शासन शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई, प्र. आ. 1990.

6) कोठेकर, शांता (संपा.), डॉ. अंधारे, भा. रा., 'नागपूर नगरी त्रिशताब्दी इतिहास ग्रंथ', नागपूर नगरी त्रिशताब्दी महोत्सव समिती, नागपूर, ऑक्टो. 2003.

7) लोखंडे, भालचंद्र, 'रिपब्लिकन पक्षाला भ्रष्ट करणारे नालायक पुढारी कोण?', धम्मचक्र प्रवर्तन दिन 1998, भीमबोधी मिशन सोसायटी, नागपूर.

8) डोंगरे कृष्णकांत कवडूजी, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीत नागपूर शहराचे योगदान', बहुजन साहित्य प्रसार केंद्र, नागपूर, प्र. आ. 2012.